नियमित खटला क्र.१०९५/२०२०
शासन वि. मोहम्मद तौसीफ व इतर
नि.क्र.३१

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ फिर्यादी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नांव | – | सलमान शकील अहमद |
| वय | – | २६ वर्ष, |
| धंदा | – | व्यवसाय |
| राहणार | – | लोधीपूरा, नागपूर |

<u>सरतपासणी–सहाय्यक सरकारी वकील ममता आवारीवार यांचेमार्फत शपथेवर सुरु:</u> –

१. यातील घटना ही दिनांक ०४.०२.२०१८ रोजी रात्री १२.००–१२.३० चे दरम्यान के.जे बिल्डींग दुकाना समोर मुख्य रस्त्यावर घडली. रात्री जेवणानंतर आम्ही मित्र मी, निहाल, तनवीर, क्रिष्णा, रशाद, विक्रम व इतर बसलो होतो. त्यावेळी चार ते पाच गाडयांमध्ये बसून आठ ते दहा लोक आले. त्यांच्या सोबत निहाल, तनवीर यांचे भांडण होते. त्यांना पाहून ते दोघे पळून गेले. त्यांनी मला पकडले. मी त्यांना सांगितले की, तुमचे भांडण माझेशी नाही, मी भांडणामध्ये नाही. त्यावेळी तौसीफने त्याच्या हातातील तलवारीच्या मुठीने माझे डोक्यात मारले. त्यानंतर शहजाद, अशफाक, आकीब, ज्याचे नाव मला सलमान वाटले होते, तौसीफ यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली. माझे हातामध्ये असलेला मोबाईल निखीलकडे टाकला. त्यानंतर मी तेथून स्वत:ला सोडवून घरी निघून गेलो. त्यानंतर मी घरून पुन्हा आल्यानंतर ते तेथून निघून गेले. मी निखीलला मोबाईलबद्दल विचारले असता त्यांनी मला सांगितले की, आरोपी मोबाईल घेवून गेले. भांडणावेळी माझे पॅन्टच्या पाकीटमधील दहा हजार रूपये आकीबने काढून घेतले. त्याच दिवशी रात्री ०२.०० चे सुमारास मी पोलीसात जावून रिपोर्ट दिला. आता मला अभिलेखावरील माझा रिपोर्ट

व छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.पी–३२ व ३३/सा.क्र.३** देण्यात येते. ज्या तलवारीने मला मारले ती तलवार पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी चारही आरोपी न्यायालयामध्ये हजर आहेत. मी त्यांना ओळखतो. तौसीफ याने मला ज्या तलवारीने मारहाण केली ती मी पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला प्रस्तुत प्रकरणामधील जप्त तलवार दाखवण्यात आली. घटनेवेळी असलेली तलवार चमकणारी होती. आता मला दाखविण्यात आलेली तलवार गुन्हयात वापरण्यात आलेली असून त्यास **आर्टीकल (एमओ–१)** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील पराग उके यांचेमार्फत.</u>**

२. फैसल उर्फ तनवीर हा माझा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच्या विरूध्द भादवि कलम ३२४ चे प्रकरण प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणामध्ये प्रस्तुत प्रकरणामधील आरोपी क्र.१ तौसीफ हा फिर्यादी आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणामधील घटना ही प्रस्तुत घटनेच्या पुर्वीची आहे. हे मला माहित नाही की, आज रोजी सदरचे प्रकरण क्र.३०९६/२०१८ न्यायालयाच्या अनु क्र.८२ वर आहे. आरोपी क्र.१ तौसीफ हा माझा नातलग आहे किंवा कसे याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीच्या कुटुंबामध्ये अनेक वर्षापासून प्रॉपर्टी संदर्भात वाद सुरू आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा वाद हा वाडवडिलांच्या प्रॉपर्टी संदर्भात आहे. हे मला माहित नाही की, आरोपीच्या परिवाराला जीवे मारण्याचा गुन्हा माझे वडिलांविरूध्द सन १९९२–१९९४ मध्ये दाखल झाला होता.

३. पोलीसांनी माझा दिनांक १२.०१.२०२० रोजी पुरवणी जबाब नोंदविला होता किंवा कसे हे मला माहित नाही. असे झाले नव्हते की, आरोपी क्र.१ तौसीफच्या सोबत असलेल्या आरोपींची नावे मला घटनेवेळी माहिती नव्हती. लेकीन तब मेरे को

सिर्फ तौसीफ का ही नाम मालूम था उसके साथीदारोका नाम मालूम नही था! सदरची पुरवणी जबाबामधील बाब चुकीची आहे. पोलीसांनी सदरचा चुकीचा जबाब का नोंदविला याचे कारण मी सांगू शकत नाही. असे घडले नाही की, मला तौसीफच्या साथीदारांचे म्हणजेच मोहम्मद अशफाक अंसारी रा. हज हाऊसचे जवळ, त्यांचा भतीजा मोहम्मद वल्द मोहम्मद शकील अंसारी व सलमान उर्फ अकीब अंसारी यांची नावे दिनांक १२.०१.२०२० रोजी समजल्याने मी पोलीस ठाण्यात जबाब देण्यास गेलो होतो. माझे पुरवणी जबाबामध्ये त्या प्रकारे घेतलेली नोंद चुकीची आहे. पोलीसांनी अशी चुकीची नोंद का घेतलेली आहे याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पुरवणी जबाब दिला होता किंवा कसे हे आठवत नाही. त्याच प्रकारे मी तो वाचून पाहून बरोबर असल्याचे त्यामध्ये नमूद आहे हे देखील मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सोबत मी सरतपासात नमूद केल्याप्रमाणे कोणतीही घटना केव्हाही न घडल्याने सदरच्या विरोधाभाषी बाबी माझे पुरवणी जबाबामध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

४. घटनेवेळी चार ते पाच गाडयांमध्ये आठ ते दहा लोक घटनास्थळावर आले होते ही बाब रिपोर्ट देतेवेळी पोलीसांना सांगितली होती. रिपोर्ट देतेवेळी तौसीफ सोबत आकीब असल्याची बाब मी पोलीसांना सांगितली होती. भांडणावेळी आकीबने माझे पॅन्टच्या खिश्यातून दहा हजार रूपये काढून घेतले होते ही बाब देखील पोलीसांना सांगितली होती. मी चुकीने आकीबचे नाव सलमान असल्याचे पोलीसांना पुरवणी जबाब नोंदवितेवेळी सांगितले होते. त्यावेळी तौसीफने त्याच्या हातातील तलवारीच्या मुठीने माझे डोक्यात मारले ही बाब पोलीसांना सांगितली होती. या सर्व बाबी माझे रिपोर्ट व पुरवणी जबाबामध्ये नोंदविलेल्या नाहीत. त्याचे कारण मी सांगू शकत नाही. मी माझा रिपोर्ट वाचून त्यावर सही केली होती. त्यावेळी माझे जबाबामध्ये काही बाबी नमूद नाहीत हे मी पोलीसांच्या त्यावेळी लक्षात आणून दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०४.०२.२०१८ रोजी तौसीफ तलवार घेवून आला नाही तसेच कोणतीही चोरी झाली नाही त्यामुळेच सदरच्या बाबी माझे रिपोर्ट मध्ये नमूद नाहीत.

५. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळापासून गणेशपेठ पोलीस स्टेशन एक किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे पायी जाण्यास दहा मिनीटे लागतात. मी पोलीस ठाण्यात घटनेनंतर अर्धा तासाने म्हणजेच ०१.००–०१.३० चे दरम्यान गेलो. मी पहाटे ०४.०० वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात होतो. मी रिपोर्टवर सही नक्की किती वाजता केली हे मी सांगू शकत नाही. पहाटे ०३.०० ते ०४.०० वाजताचे दरम्यान मी पोलीस स्टेशन सोडले. त्यावेळी मी रिपोर्टची प्रत सोबत घेवून गेलो. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट देतेवेळी मी तलवारीचे वर्णन नमूद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला केव्हाही तलवारीची ओळख पटविण्याकामी पोलीस ठाण्यात बोलाविले नाही. मी माझा चोरीला गेलेला मोबाईल संदर्भात बिल पोलीसांना दिले होते. सदरचे बिल अभिलेखावर दाखल नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा कोणताही मोबाईल चोरीला गेला नसल्याने मी त्याचे बिल पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, ना माझा मोबाईल ना माझे पैसे केव्हाही चोरीला गेले. हे म्हणणे खरे आहे की, मला दाखविण्यात आलेली तलवार ही गंजलेली असून ती पुर्णपणे रंगाने माखलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला दाखविण्यात आलेल्या तलवारीसारख्या अनेक तलवारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला दाखविण्यात आलेली तलवार ओळखण्यासाठी कोणतीही विशेष खूण नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुतची तलवार ही अंदाजाने ओळखली. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत तलवारीचा घटनेशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या मध्ये प्रॉपर्टीच्या वादामधून माझे भावाने प्रस्तुत आरोपी तौसीफ याला चाकूने मारून जखमी केले. त्यातून कलम ३२४ चे प्रकरण दाखल झाले. हे मला माहित नाही की, त्याच प्रकरणात शहजाद याच्या छातीवर चाकूने वार करण्यात आले व तो तीन दिवस दवाखान्यात दाखल होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, आकीब याच्या गालावर माझे भावाने चाकूने वार केला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, प्रॉपर्टीच्या वादातून माझे भावाने सर्व आरोपींना चाकूने मारहाण करून जखमी केले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे भावाविरूध्द आरोपींनी केलेल्या केसला शह देण्यासाठी मी प्रस्तुतचे खोटे प्रकरण आरोपींविरूध्द दाखल केले. हे म्हणणे खरे नाही

की, माझे भावाला वाचवण्यासाठी तसेच आरोपींना प्रकरण मिटवून घेण्याचा दबाव आणण्यासाठी कोणतीही घटना घडलेली नसताना मी प्रस्तुतची खोटी फिर्याद देवून आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये सांगितलेला सर्व मजकूर खोटा सांगितला आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.03.13 17:20:30 +0530

**नागपूर.** **(कौस्तुभ नागेश मराठे)**

**दि.१२/०३/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर.**

**कोर्ट क्र.१**